# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी /शि.शु./२००६/ ८९९

दिनांक : 10 ऑक्टोबर OCT 2006

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद /अमरावती व नागपूर.

विषय : या संचालनालयाच्या अधिपत्त्याखाली सुरु असलेल्या संस्थामध्ये शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेल्या शिक्षणशुल्क लागू करण्याबाबत

संदर्भ : कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांचे पत्र क्र.एसएसएरा/२००६/१२१४,दि.२३.०९.२००६.

उपरोक्त विषया संदर्भात कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती बांद्रा, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेले दि.२३.०९.२००६ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे सदर पत्रामध्ये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

Kindly note that the above order of the Hon'ble Court pertains to charging of fees for the Academic year 2002-03 rate for "through out the course". Whereby, it is clear that once the course period is over and if the student has not able to cleare the course , then such student, shall be liable to pay the fees applicablein that Academic Year. It may also be noted that this order pertains to all the students who had taken admission in AcademicYear2002-03 or prior to Academic year 2002-03. Finally, as regard, fees fixed in the Year 2006-07 and payable without any retrospective effect by such student.

तरी आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्त्याखाली सुरु असलेल्या सर्व संस्थांना शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांचे दिनांक २३.०९.०६ रोजीच्या पत्राची प्रत पाठवून सदर पत्रात नमूद केलेल्या वरील परिच्छेदाचे काटेकोरपणे पालन करुन व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच प्रत्येक संस्थेतील सूचना फलकावर शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काचे दर ठळक अक्षरात व शिक्षण शुल्क समितीचे वरील संदर्भाधिन पत्र दि.२३.०९.२००६ च्या पत्राची प्रत विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा रितीने सूचना फलकावर लावण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच शिक्षण शुल्क समितीने दिलेल्या सूचनेनुसारच विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यास कळविण्यात यावे व कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शिक्षण शुल्क आकारण्यात येऊ नये. अन्यथा पुढील होणाऱ्या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील, अशी तंबीह देण्यात यावी.

मुलि | सहसंचा | प्रसहसंचा

(प्रा. न.बा. पासलकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:-

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना कार्यालयीन सचिव समिती, बांद्रा, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेले दि.२३.०९.२००६ रोजीच्या पत्राच्या प्रतीसह माहितीसाठी सादर.

२. कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती शासकीय तंत्रनिकेतन, इमारत, ४९ , खेरवाडी, अली यावर जंग मार्ग बांद्रा, मुंबई-५१ यांचे पत्र दि.२३.०९.२००६ च्या अनुषंगाने माहितीसाठी सादर.

# DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION

**MAHARASHTRA STATE**

**3, MAHAPALIKA MARG, POST BOX NO. 1967, MUMBAI-400 001.**
**PH: 2264 1150, 2264 1151, 22620601, 22690602, FAX: 22692102**
Telegram: Edutech E-Mail: desk2@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

**SPEED POST**

No.2/NGC/2007/Lokayukta Case/788
Date:- 29 आगस्त AUG 2007

To
The Joint Director of Technical Education,
Regional Office,
Mumbai/Pune/Nagpur/Nashik/Amravati/Aurangabad.

**Sub:- Lokayukta Case No.7621/ 2005(T-15)**
**Complaint lodged by Shri R.A.Rane, Audyogik Shikshan Mandal's Institute of International Business & Research, Thane.**

Enclosed please find herewith recommendation report received from office of the Lokayukta, Maharashtra, New Administrative Building, First Floor, Madam Cama Road, Mumbai - 400 032 against the complaint lodged by Shri L.K.Rane, a student of the above institute for MBA/ IB Course for the year 2004-05.

The Hon'ble Lokayukta, Maharashtra has directed to this office in his report as under :-

"Director of Technical Education may take all steps as discussed in the foregoing paras to ensure that all costs be borne by the students are indicated in the Information Brochure. Director of Technical Education may separately examine whether there was need to take instructions from Shikshan Shulk Samiti in this regard."

You are, therefore, informed that all the institutions running Diploma, Degree and Post Graduate Degree courses in Engineering, Pharmacy, Architecture, Hotel Management and Post Graduate Courses in MBA and MCA and all other courses duly approved by AICTE New Delhi are required to indicate the fees (Tuition, Development and other fees), charges of study materials and cost of expenditure for each and every head for which they are charging from the students, should indicate in their Information Brochure. Similarly, all the institutions are required to charge fees as determined by the Shikshan Shulk Samiti only for their courses and it should not be charged more than the fees determined by the Shikshan Shulk Samiti under any circumstances. In case receipt of any complaint from any student or their parent regarding charging of the fees more than the fees prescribed by the Shikshan Shulk Samiti, institution will be fully held responsible for all the consequences.

You are, therefore, informed to bring all the above instructions to the notice of all the institutions running under your region.

Please send the compliance report.

(Prof. N.B.Pasalkar)
Director of Technical Education,
M.S., Mumbai.

प.मो. म.ना. सह-संचालक_ प्र.सहसंचालक

## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk2@dtc.org.in Internet : http://www.dtc.org.in

क्रमांक : २/एनजीसी/लोकआयुक्त/२००८/४४५
दिनांक :

प्रति,
सहंसचाक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय : (लोक आयुक्त प्रकरण क्र.७६२/२००५ आय-१५)
श्री.एल.आर.राणे यांनी औद्योगिक शिक्षण मंडळाचे इन्स्टिटयुट ऑफ इंटरनॅशनल बिझनेस ॲण्ड रिसर्च ठाणे येथील प्रशिक्षणासाठी अवाजवी फी आकारण्याबाबत मा.उपलोक आयुक्त यांच्याकडे केलेली तक्रार.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/२००७/लोक आयुक्त केस.७८८, दि.२९.११.२००७.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/२००७/१०८७, दि.२३.११.२००७.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, वरील दोन्ही पत्रान्वये आपणास आपल्या विभागांतर्गत सुरु असलेल्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र//हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी/पदविका संस्था तसेच एमबीए/एमसीए/एमई इत्यादी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांकडून माहितीउपलब्ध करुन वरील संदर्भाधिन पत्र दि.२३.११.२००७ मध्ये नमूद केलेल्या विवरणपत्रामध्ये अभ्यासक्रमनिहाय माहिती या कार्यालयास दोन प्रतीत त्वरीत सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने आपण या कार्यालयाकडे आपल्या विभागांतर्गत सुरु असलेल्या संस्थेची माहिती सादर केली आहे. परंतु त्यामध्ये अनेक संस्थांची माहिती अप्राप्त म्हणून नमूद करण्यात आलेली आहे. याबाबत मा.लोक आयुक्त यांच्या कार्यालयाकडून वारंवार विचारणा होत आहे. तसेच मा.लोक आयुक्त यांनी सदर माहिती सर्व संस्थांकडून उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यास कळविले होते. याबाबत आपणास दूरध्वनीवरुन सुध्दा सूचना देण्यात आली होती. तरी आपणास कळविण्यात येते की, आपल्या विभागातील ज्या संस्थांनी माहिती सादर केलेली नाही त्या सर्व संस्थांशी संपर्क साधून त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व या कार्यालयाकडे विहित नमुन्यात सदर माहिती दोन दिवसात सादर करावी. अन्यथा याची सर्व जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

याबाबत आपणास पुढे असे कळविण्यात येते की, आपल्या विभागातील विना-अनुदानित तत्त्वावर सुरु असलेल्या सर्व संस्थांना विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क, विकास शुल्क, इतर शुल्क व स्टडी मटेरियल चार्जेस त्यांच्या माहिती पुस्तिकेमध्ये ठळक अक्षरात नमूद करणे व यांसबंधीची सर्व माहिती संस्थेच्या वेबसाईटवर प्रकाशित करणे आवश्यक आहे असे कळवावे. तसेच शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या दरापेक्षा व संस्थेने माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या शुल्कापेक्षा जास्त फी/शुल्क कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये. तसेच जर कोणत्याही विद्यार्थ्याकडून किंवा पालकाकडून अतिरिक्त शुल्क/फी घेतल्या संबंधीची तक्रार प्राप्त झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहिल, अशा सूचना पुन्हा आपल्या अधिपत्त्याखालील सर्व विना-अनुदानित संस्थांना देण्यात याव्यात व त्याची एक प्रत या संचालनालयास पाठविण्यात यावी.

(सही)
( डॉ.सु.का.महाजन )
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.